# गोवा किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण

व्दारा पर्यावरण खाते, गोवा सरकार
धेंपो टॉवर्स, पाटो–पणजी–गोवा
फोन (०८३२) २४३८५११

नं. जीसीझेडएमए/जाहीर सूचना – २०१४/१/१७३०

दिनांक : २४.१२.२०१४

## जाहीर सूचना

माननीय राष्ट्रीय हरीत लवाद (पश्चिम क्षेत्र) पीठ, पुणे यांनी अलेक्सो परेरा विरूद्ध गोवा राज्य व इतर या विषयामध्ये अर्ज नं. ०३/२०१४ मध्ये दिनांकित १७.१२.२०१४ निवाड्यात अन्य विषयासह निर्देश दिला की सध्याच्या मौसमात जे शॅक्स उभारण्यात आले आहेत त्यांनी येत्या दोन (२) आठवड्यात सीआरझेड क्लिअरन्ससाठी गोवा किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (जीसीझेडएमए) यांच्याकडे अर्ज करावा आणि अशा परवानग्या प्रदान करण्यासाठी/नाकारण्यासाठी सदर अर्जाचे परीक्षण सदर प्राधिकरण पुढील दोन (२) आठवडयात करेल. जर शॅक पुरवठादार दोन (२) आठवड्यामध्ये जीसीझेडएमए परवानगीसाठी अर्ज करत नसतील तर सदर जीसीझेडएमए सदर शॅक्स पाडण्यासाठी आवश्यक ते निर्देश जारी करेल.

वरील संदर्भात गोवा राज्यात सीआरझेड क्षेत्रातल्या कार्यान्वीत शॅक्सचे ऑपरेटर/मालक यांच्यासह सर्व हितसंबंधीतांनी माननीय एनजीटीच्या सदर निर्देशांची दखल घ्यावी आणि सीआरझेड अधिसूचना २०११ अंतर्गत आवश्यक दस्तऐवज, छाननी शुल्क, इत्यादींसह ३१.१२.२०१४ पर्यंत परवानगीसाठीच्या विहीत नमुन्यामध्ये जीसीझेडएमए यांच्याकडे अर्ज करावेत.

निर्धारित तारखेनंतर मिळालेले अर्ज आणि अपूर्ण अर्ज तात्काळ नाकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

सही/–
सदस्य सचिव
गोवा किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण

डीआय/जाहिरात/१५५७/२०१४

# वाणिज्य कर आयुक्त यांचे कार्यालय

गोवा सरकार, पणजी–गोवा